# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**<u>प्रेसनोट क्र.३० दिनांक २२/०३/२०२१</u>**

## तलासरी पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थांची वाहतुक करणा-या आरोपीतांस अटक

दिनांक २१/०१/२०२१ रोजीचे ०१.०० ते ०२.०० वाजे च्या सुमारास तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे मौजे आच्छाड बोर्डर चेक पोस्ट ता.तलासरी, जि.पालघर येथे संशयीत वाहनांची तपासणी करत होते. तपासणी दरम्यान महींन्द्रा बोलोरो पिकअप क्रमांक एम.एच ०५ बीएच ३२८५ यामध्ये प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थाचा माल वाहनामध्ये मिळुन आला. सदरचा माल हा मानवी आरोग्यास अपायकारक आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला आहे. हे माहीत असतानाही शासकीय आदेशाची अवहेलना करुन विक्री करण्यासाठी यातील दोन आरोपीत हे वाहतुक करुन घेवुन जात असताना मिळून आले.

आरोपीत याचे ताब्यातुन १)५,००,०००/- रु.किमतीची सफेद रंगाची पिकअप क्रमांक एम.एच०५बीएच ३२८५ २)२,३३,३७६/- रु.किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला विमल पानमसाला एकुण ०६ खाकी रंगाच्या गोण्या ३)४१,१८४/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला व्ही-१ तंबाखु एकुण ६ सफेद रंगाचे गोणी ४)१,३०,६८०/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला विमल पानमसाला एकुण ०३ खाकी रंगाच्या गोण्या ५)१४,५२०/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला व्ही-१ तंबाखु एकुण ०३ निळसर रंगाचे गोण्या ६)७४,८८०/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला ०३ खाकी रंगाच्या गोण्या ७)१८,७२०/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला ०३ खाकी रंगाच्या गोण्या ८) २,५९,२००/- रुपये किंमतीचा ०४ खाकी रंगाच्या गोण्या प्रत्येकी गोणी मध्ये ०३ सफेद रंगाच्या गोण्या ९) ४३,२००/- रुपये किंमतीचे ०२ खाकी रंगाच्या गोण्या त्यामध्ये ०३ पिवळया रंगाच्या गोण्या असा एकुण १३,१५,७६०/-रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत याचे विरुध्द <u>तलासरी पोलीस ठाणे</u> गु.र.नं. I ३६/२०२१ भा.द.वि.स.कलम ३२८,१८८, २७२, २७३, ३४ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नियम व नियमने २०११ कलम- २३(२),२७,२३,२६ (२)(४), ३०(२)(अे) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत क्र.१ व २ यांना दिनांक २१/०३/२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पो.उपनि/अंकुश वारंगसे, हे करित आहेत.

सदरची कारवाई पोनि/अजय वसावे, प्रभारी अधिकारी, तलासरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner